ISSN 2348- 5825

International Registered & Recognized Research
Journal Related to Higher Education for all Subjects

# Indo Asian Philosopher

(Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - IV, Issue - VIII, Vol. - II | Impact Factor 2.62 (GRIFI) | Oct. 2016 To Mar. 2017

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
* Dist.Nanded *



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

EDITOR IN CHIEF

DR. BALAJI KAMBLE

IMPACT FACTOR 3.63

ISSN [illegible]

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
...OOR COLLEGE, DEGLOOR

IAP
INDO ASIAN PHILOSOPHER

International Registered & Recognized Research
Journal Related to Higher Education for All Subjects

# INDO ASIAN PHILOSOPHER

## REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : VIII, Vol. II

Year- IV, Bi-Annual(Half Yearly)

(Oct. 2016 To Mar. 2017)

Editorial Office :
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Website
www.irasg.com

Contact : - 02382 - 241913
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

E-mail :
visiongroup1994@gmail.com
interlinkresearch@rediffmail.com
mbkamble2010@gmail.com

Published by :
Indo Asian Publication.

EDITOR IN CHIEF

Dr. Balaji Kamble
Research guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur (M.S.) India

EXECUTIVE EDITORS

Dr. Ambuja Malkhedkar
Gulbarga, Dist. Gulbarga
(Karnataka)

Dr. M. G. Shaikh
Dept. of Commerce,
L. B. S. College,
Dharmabad, Dist. Nanded( M. S.)

DEPUTY EDITOR

Dr. Kusum Kashyap
Dept. of Botany,
Government College,
Chattarpur (M.P.)

Dr. M. G. Bahare
Head, Dept. of Zoology
A. S. C. College,
Naldurg, Dist. Osmanabad (M.S.)

CO - EDITOR

Dr. Arun R. Kumbhar
Head, Dept. of Economics,
Arts & Comm. College,
Nesri, Dist. Kolhapur (M.S.)

Vanita S. Jadhav
Madar Terisa B.Ed. College,
Dharwad, Dist. Dharwad
( Karnataka)

MEMBER OF EDITORIAL BOARD

Dr. Balasaheb S. Patil
Head, Dept. of Economics,
C. K. T. College,
Panvel, Dist. Raigarh (M.S.)

Dr. Dilip R. Jagtap
Dept. of Economics,
G. T. Patil College,
Nandurbar, Dist. Nandurbar(M.S.)

Dr. Mohmmad T. Rahaman
Dept. of Biomedical Science,
International Islamic University,
Mahkota (Malasiya)

Dr. Kiran Khandare
Dept. of English,
Shivaji College,
Akola, Dist. Akola ( M.S. )

Dr. Bhaskar S. Wazire
Head, Dept. of History,
Sitabai Arts College,
Akola, Dist. Akola (M. S.)

Omprakash Madansure
Head, Dept. of Sanskrit,
Rajarshi Shahu College,
Latur, Dist. Latur (M.S.)

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded

Issue : VIII, Vol. II
IAP
IMPACT FACTOR 2.62
ISSN 2348-5825
Oct. 2016 To Mar. 2017

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Assessment of E-Governance Initiatives at Panchayat Raj Institution Level - A Case Study of Bhokar and Kinwat Blocks of Nanded District, Maharashtra | Manoj S. | 1-10 |
| 2 | चीन आणि ग्वादरचे सामरिक महत्व | सुभान जाधव | 11-18 |
| 3 | काळा पैसा आणि भारतीय अर्थव्यवस्था | डॉ. डी. के. राठोड | 19-22 |
| 4 | राष्ट्रउभारणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार | एन. बी. मठपती | 23-26 |
| 5 | पैशाच्या मागणीबाबतचे विश्लेषण | गोपाल रा. तडस | 27-30 |
| 6 | स्वामी विवेकानंदाचे स्त्रीविषयक विचार | डॉ. सुभाष देशमुख, ज्योती आर. वाघ | 31-34 |
| 7 | तथ्य संकलनाची समस्या व उपाय | अरुण यु. पाटील | 35-37 |
| 8 | नानाजी देशमुख यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान | दत्तात्रय भिका चौधरी | 38-40 |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आर्थिक समाजवाद | गोपाळ आर. सुर्यवंशी | 41-44 |
| 10 | आधुनिक ग्रंथालयातून होणाऱ्या अेलीकॉन्फरन्सींग तंत्राच्या वापराची संशोधनात्मक दृष्टीकोनातून उपयुक्तता - एक अभ्यास | डी. बी. मस्के | 45-47 |
| 11 | अलिप्ततावादी चळवळीची प्रासंगिकता | डॉ. रत्नाकर बी. | 48-54 |

Indo Asian Philosopher (IAP)
IMPACT FACTOR 2.62
ISSN 2348-5825
Indo Asian Philosopher (IAP)
Issue : VIII, Vol. II
Oct. 2016 To Mar. 2017
www.irasg.com
Political Science
11
Research Paper

# अलिप्ततावादी चळवळीची प्रासंगिकता

डॉ. रत्नाकर बी. लक्षटे
राज्यशास्त्र विभाग,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड (महाराष्ट्र) भारत

वर्तमान आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेक आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संघटना आहेत. या सर्व संघटना आपापल्या परीने आंतरराष्ट्रीय राजकारणाला आकार देण्याचे काम करतात. वर्तमान जागतिक व्यवस्थेत आर्थिक व व्यापारी विकासास महत्व देणाज्या संघटनांचा बोलबाला आहे. या संघटनांच्या माध्यमातून सर्व राष्ट्र सबका साथ सबका विकासाचे धोरण स्विकारत आहेत. या ठिकाणी अशाच एका आंतरराष्ट्रीय स्वरुप असलेल्या संघटनेच्या वाटचालीचा आढावा घेवून वर्तमान आंतरराष्ट्रीय परिदृश्यातील त्याची उपयुक्तता जाणुन घेण्याचा प्रयत्न केला. त्या संघटनेच्या उदयाचा कालखंड शितयुध्दाचा आहे. अमेरिका व सोव्हिएत युनियनच्या आपापसातील सत्ता संघर्ष, गटबाजीचे राजकारण व नवस्वतंत्र राष्ट्रांनी विकासाचे प्रारुप कोणते स्विकारावे ? या सारख्या असंख्य प्रश्नांनी या संघटनेच्या उदयाला खतपाणी घातले. त्या संघटनेला जग नाम (NAM) या नावाने संबोधते. ज्यास अलिप्ततावादी चळवळ या नावाने मराठीत संबोधले जाते.

अलिप्ततावादी चळवळ विकसित देशांच्या तुलनेत तिसज्या जगातील देशांच्या सामुहिक राजकीय आणि आर्थिक प्रश्नांच्या अभिव्यक्तीसाठी एका व्यासपीठाचे कार्य करते. या संघटनेत साधरणतः १२० ते १३० देश सदस्य आहेत.

**उगम आणि विकास :-**

अलिप्ततावादी चळवळीचा उदय २० व्या शतकाच्या मध्यात लहान देश, विशेषत : नवस्वतंत्र राज्याच्या व्यक्तिगत प्रयत्नांतून झाला. या सर्व राज्यांनी आपल्या सार्वभौम व स्वातंत्र्यास जिवंत ठेवण्यासाठी कोणत्याच महासत्तेत सहभागी न होणयचा निर्णय घेतला होता. महासत्ताक संकल्पना आणि नवसाम्राज्यवादाच्या

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

संयुक्त आघाडी स्थापने आणि द्वितीय महायुध्दानंतरच्या शीतयुध्दातील विभागणी समूहास न स्वीकारण्यासाठी १९५० च्या दशकात नव स्वतंत्र देशात व्यापक सहमतीच्या प्रक्रियेचा प्रारंभ झाला. या उद्देशाने १९५५ साली बांडुंग येथे आफ्रो-आशिया संमेलन भरले. देशांनी भाग घेतला. या सम्मेलनास अपेक्षित यश आले नाही. कारण अनेक देश आपल्या धोरणास साम्राज्यवाद विरोधी झेंड्याखाली संचालित करण्यास तयार नव्हते. परंतु या संमेलनाने राज्यासमोरील राजकीय आणि आर्थिक असुरक्षिततेच्या भीतीस स्पष्ट केले. १९५० च्या दशकाच्या शेवटी युगोस्लाव्हियाने आंतरराष्ट्रीय संबंधात अलिप्ततावादी राजकीय ओळख बनवण्यात दाखवली. १९६१ च्या बेलग्रेड येथील २५ अलिप्ततावादी देशांच्या प्रमुखांच्या पहिल्या संमेलनापर्यंत हे प्रयत्न सुरु होते. या संम्मेलनाचे आयोजन युगोस्लाव्हियाचे राष्ट्राध्यक्ष जोसेफ टिटो यांच्या प्रयत्नांमुळे आयोजित झाले. ज्यांनी शस्त्रांची वाढती स्पर्धा पाहून तत्कालीन सोव्हिएत युनियन आणि संयुक्त राज्य अमेरिकेत केंव्हाही युध्द होवू शकते अशी शक्यता व्यक्त केली होती. बेलग्रेड परिषदेत सहभागी होणारे अधिकतम देश आशिया व आफ्रिका खंडातील होते. अलिप्ततावादाच्या परिषदा आयोजित करण्यात सक्रिय असणाऱ्या इतर नेत्यांत इस्त्राइल/इजिप्तचे गमाल अब्दूल नसीर, भारताचे पंडीत जवाहरलाल नेहरू आणि इंडोनेशियाचे सुकार्णो प्रमुख होते.

नामचे दूसरे संम्मेलन काहीरात १९६४ साली झाले. या संम्मेलनात पश्चिमेकडील नववसाहतवाद आणि परकीय सैनिकी अवहेलना व निषेध करण्यात आला. परंतू १९६० च्या दशकातील कालावधीने चळवळीत एक अस्थिर आणि आकस्मिक संघटनेचे रुप धारण केले. अलिप्ततावादी देशांच्या कार्यास योग्य दिशेने नेण्यासाठी कोणतीही संस्थात्मक संरचना उपलब्ध नव्हती. नामचे तिसरे संम्मेलन १९७० ला लुसाकात झाले. ज्यात नियमितपणे अलिप्ततावादी राज्याचे संम्मेलन आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. १९७३ साली अल्जियर्स मध्ये झालेल्या चौथ्या संम्मेलनात हे ठरवण्यात आले की, दोन संम्मेलनाच्या मध्यकाळात अलिप्ततावादी राष्ट्रांच्या सर्व हालचालीत समन्वय स्थापित करण्यासाठी समन्वयक ब्युरोची औपचारीक रुपाने स्थापना करण्याचा निर्णय घेतला.

**उद्देश :-**

१९६१ च्या बेलग्रेड संम्मेलनापासून ते आजपर्यंतच्या नामच्या वाटचालींवर प्रकाशझोत टाकल्यास त्याची उद्दिष्ट्ये स्पष्ट होतात.

१) वर्चस्ववादाच्या भावनेवर आधारित जुन्या जागतिक व्यवस्थे ऐवजी स्वातंत्र्य, समता, सामाजिक न्याय आणि सर्व-कल्याणाच्या सिध्दांतावर आधारित नव्या जागतिक व्यवस्थेची स्थापना करणे.

२) शांततापुर्ण मार्गाने शांतता, नि:शस्त्रीकरण आणि वादविवादाचे समाधान शोधण्याचे प्रयत्न करणे.

३) जगातील आर्थिक प्रश्न विशेषत: असंतुलीत आर्थिक विकासाचे प्रभावशाली आणि योग्य समाधान शोधणे.

... आणि परकिय अधिग्रहणाच्या अधीन राहणाऱ्या सर्व लोकांसाठी

६) स्थिर आणि पर्यावरणात्मक दृष्टीने शाश्वत विकास.

७) मुलभूत अधिकार आणि स्वातंत्र्यास प्रोत्साहन देणे.

८) संयुक्त राष्ट्र संघटनेची भुमिका आणि प्रभावात सशक्तता आणण्यासाठी सहकार्य देणे.

वरील सर्व उद्देशांची मांडणी १९६१ च्या बेलग्रेड शिखर संम्मेलनात करण्यात आली.

**संरचना :-**

अलिप्ततावादाच्या संरचनात्मक ढाच्यात राष्ट्रप्रमुखांचे संमेलन, विदेश मंत्र्याची बैठक आणि समन्वय ब्युरोचा समावेश आहे. राष्ट्रप्रमुखांच्या संम्मेलनात सर्व सदस्य देशांचे राष्ट्रप्रमुख सहभागी होतात. या सम्मेलनाचे आयोजन दर तीन वर्षांनी केले जाते. संम्मेलनाचे आयोजन करणारे देश नामचा अध्यक्ष म्हणून कार्य करतो. राष्ट्रप्रमुखांच्या संम्मेलनात घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक वर्षी विदेश मंत्र्यांची बैठक होते. १९७३ साली स्थापित समन्वय ब्युरो, अलिप्ततावादांचे एक मुख्य अंग म्हणून काम करते. त्याचे ३६ सदस्य आहेत. जे प्रादेशिकतेच्या आधारावर निवडले जातात. उदा : आफ्रिका १७, आशिया-१२, लॅटिन अमेरिका-५, युरोप-१ तसेच एका जागेवर युरोप आणि आफ्रिकेचे हक्क असतात. संम्मेलन आयोजित करणे आणि प्रशासनिक कार्य करण्यासाठी ब्यूरोची मंत्री आणि अधिकारी स्तरीय बैठक होते. संयुक्त समन्वय समिती आणि जी-७७ चे संयुक्त संचलन असते. तसेच यात दोन समुहाच्या हालचाली विशेषत: उत्तर-दक्षिण आणि दक्षिण-दक्षिण विषयावरील परस्पर दृष्टीकोणावर समन्वय स्थापित करण्यावर विचार होतो.

**उपक्रमशीलता/घडामोडी :-**

अलिप्ततावादाचे प्रमुख राजकीय ध्येय पुढील प्रकारचे आहे. जागतिक शांततेला सुरक्षित ठेवणे, निशस्त्री करणास प्रोत्साहित करणे आणि आंतरराष्ट्रीय संबंधात स्वातंत्र्य आणि समता मिळवणे. य ध्येयांना प्राप्त करण्याच्या हेतूने बेलग्रेड संम्मेलन १९६१ मध्ये २७ सूची घोषणापत्र बनवले. ज्यात वसाहतवा आणि साम्राज्यवादाच्या सर्व प्रकारचा निषेध केला. १९६४ साली आयोजित काहिर संम्मेलनात शांतत आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य कार्यक्रम स्विकारण्यात आला. या घोषणेत यावर भर देण्यात आला की शांततेची स्थापना तेंव्हाच शक्यच आहे जेंव्हा सार्वजनिक स्वातंत्र्य, समता आणि न्यायाच्या सिध्दांता पालन होईल. साम्राज्यवाद, वसाहतवाद आणि नव-वसाहवादाचा अंत होईल.

१९७० च्या दशकात अलिप्ततावादी संघटनेच्या सदस्यत्वात तीव्र गतीने वाढ झाली. तर संस्थाप सदस्य असणारे अलिप्ततावादी देश दुसऱ्यावाजूने अनेक नवे सदस्य फक्त सिध्दांतात अलिप्ततावादी हो तसेच गुप्तरित्या पश्चिमी आणि साम्यवादी देशासोबत सहानुभूतीची भुमिका ठेवत. वास्तवतेत अने समाजवादी विकसनशील देशांच्या बाबतीत अलिप्ततावादी चळवळ अनेक आंतरराष्ट्रीय विषयावर अलिप्तताव न राहता नेहमी सोव्हिएत युनियन आणि त्यांच्या सहकार्याच्या बाजूनेच झुकतात. अशा स्थितीपास सावरण्यासाठी १९७९ च्या हवाना संम्मेलनात [illegible] विरोधी आणि [illegible] विरोधी [illegible] आणि

सर्व लोकांची समता आणि आत्मनिर्णय व जातीय समानतेच्या क्षेत्रात अलिप्ततावादाची भूमिका
ल्लेखनीय राहिली. १९६१ आणि १९६३ च्या संम्मेलनात तत्कालीन राष्ट्रीय चळवळींना अलिप्ततावादाने
ीक, राजकीय आणि आर्थिक समर्थन देण्याची प्रतिज्ञा केली. १९८६ च्या शिखर संम्मेलनात दक्षिण
फ्रिकी शासनाच्या पृथक्करण धोरणाची निंदा करण्यात आली. नामीबियाचे स्वातंत्र्य चळवळीचे समर्थन
ले. व्हिएतनाममध्ये व्हिएतनामी लोकांच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक व्यवस्था विकसित
रण्याच्या अधिकाराचे अनुमोदन केले. क्युबात दमनकारी स्थानिक शासनाच्याविरुध्द वसाहतवादी
रोधी चळवळीचे समर्थन केले. नाम पश्चिम आशियात फिलीस्तीनी लोकांच्या मातृभूमिच्या अधिकाराचे
मर्थन करतात. इस्त्राइल मार्फत पश्चिमेकडील शक्तींच्या गुप्त समर्थनात स्थानिक निवाश्यांच्या विस्थापन
ाणि भौतिक नाशाची निंदा करतात. १९९७ मध्ये नामने इस्त्राइल मार्फत अधिकृत क्षेत्र आणि पूर्वी
जेरुसलेमच्या यहूदी वस्त्यांची निंदा केली व फिलीस्तानच्या अधिक सहकार्याची मागणी केली. तसेच
दस्यांना विनंती केली की, तोपर्यंत इस्त्राइलशी संबंध सुधारण्याचे प्रयत्न करु नयेत जोपर्यंत इस्त्राइल
ासन शांतता प्रक्रियेत सकारात्मक प्रभाव स्थापित करत नाही.

अलिप्ततावादी संघटना अण्वस्त्राच्या वापरावर प्रतिबंध आणि सर्वसमावेश अणुचाचणी बंदीची
ागणी करते. संयुक्त राष्ट्र संघ आणि आंतरराष्ट्रीय संस्थांना विकसनशील देशांच्या गरजेनुरुप बनवण्यासाठी
्या संस्थात सुधारणेचे प्रस्ताव पारित केले. १९९१ नंतर युगोस्लाव्हियात झालेले बदल आणि आंतरराष्ट्रीय
राजकारणातील चढ उताराने नामच्या प्रासंगिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. तसेच अलिप्ततावादी
संघटना नष्ट करावी अशी मागणी होवू लागली. परंतू इंडोनेशियाच्या अध्यक्षतेने १९९२ साली अलिप्ततावादात
नवीन संजीवनी भरली. अलिप्ततावादाने स्वत:ला आंतरराष्ट्रीय संबंधाच्या मुख्य प्रवाहाचे एक जिवंत
सकारात्मक आणि वास्तविक अर्थाने स्वतंत्र घटकांच्या रुपात प्रस्तुत करण्याचा निर्णय घेतला.

आर्थिक समतेची स्थापना करणे हा नामचे एक प्रमुख सिध्दांत आहे. अलिप्ततावादाची आर्थिक
प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करण्याची प्रक्रिया १९७८ पासून सुरु झाली. जेंव्हा अल्जीयर्स शिखर संम्मेलनात गरिब
देशांकडून औद्योगिकदृष्ट्या प्रगत जगताविरुध्द संयुक्त कार्यवाही करण्याची अपील केली. या अपीलला
संयुक्त राष्ट्र संघटने अंतर्गत नवीन आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या चर्चेचा आधार मानले. अलिप्ततावादाने
उत्तर आणि दक्षिणच्या चिरकालीन आर्थिक विभाजनाच्या चर्चेला केंद्रस्थानी आणले. १९९२ च्या शिखर
संम्मेलनात नाम ने विकसित देशांना एक अधिक न्यासंगत जागतिक आर्थिक व्यवस्थेची स्थापना विकसनशील
देशांना वस्तुंच्या कमी भावाच्या समस्येच्या बदल्यात मदत आणि कर्जाच्या व्याजाची समाप्ती यास
प्राथमिकता देण्याची अपील केली. तसेच सदस्यांशी आग्रह केला की लोकसंख्या नियंत्रण आणि अन्नधान्य
पुर्ततेच्या क्षेत्रात स्वावलंबन आणण्या बाबतीत समर्पकता दाखवावी. सदस्यात दक्षिण-दक्षिण व्यापार आणि
परकीय सहकार्याप्रती समर्पण भावनेची अपील केली. कारण आर्थिक क्षेत्रात विकसनशील देशाच्या
...कडील देशांची उत्तरेवरील परावलंबिता कमी व्हावी. नाम ने औद्योगिक
... स्विकारण्याची मागणी केली. १९९८ च्या डरबन

शिखर संम्मेलनात आईएमएफ, जागतिक बँक आणि डब्ल्युटीओ ... विकसनशील देशातील भूमिकांची समीक्षा करण्यासाठी एक संवाद स्था... २०१५ साली जागतिकीकरणाचे सकारात्मक आणि नकारात्मक प्रभावाची नाममध्ये प्राधा... बाडुंग संम्मेलनास अलिप्ततावादी चळवळीची आधारशिला म्हणतात. या संम्मेलनास ५० वर्षापूर्वीचा आनंदोत्सव २००५ साली त्या शहरात साजरा केला. या संम्मेलनात निर्धारित अलिप्ततावादी चळवळीच्या सिध्दांताची निश्चिती याप्रमाणे आहे, राष्ट्राचे सार्वभौमत्व, प्रादेशिक एकात्मता व सार्वभौमत्वात विश्वास, अंतर्गत प्रकरणात अहस्तक्षेपाचे धोरण, समस्यांचे शांततेच्या मार्गाने निरसन ई. या सिध्दांत आणि अलिप्ततावादी धोरणाचे समर्थन करणाज्या राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर सामुहिक प्रयत्न करण्याच्या दृष्टिने अलिप्ततावादी चळवळीचा प्रारंभ झाला. पहिल्या संम्मेलनात याचे फक्त २५ देश सदस्य होते. परंतू २०१४ पर्यंत त्यात वाढ़ होवून १२० झाली.

ईरानची राजधानी तेहरानमध्ये २६ ते ३१ ऑगस्ट २०१२ मध्ये अलिप्ततावादी चळवळीचे १६ वे शिखर संम्मेलन झाले. या शिखर संम्मेलनात नामचे परिणाम आणि उपलब्धिची चर्चा झाली. तसेच सामुहिक सुरक्षितता व जागतिक शांतता, प्रत्येक प्रकारच्या दहशतवादाचा प्रतिकार, एन.पी.टी. करारा अंतर्गत सर्व देशांच्या अण्वस्त्र अधिकारांचे संरक्षण आणि अण्वस्त्र शस्त्रांना नष्ट करण्यावर भर, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ढाच्यात बदल आणि सुधारणेची आवश्यकता, सर्व देशांच्या सार्वभौमत्वाचा सन्मान, दुसज्या देशांच्या अंतर्गत क्षेत्रात हस्तक्षेप न करणे, फिलिस्तानचा विषय आणि जागतिक नेतृत्वास सहकार्य इ. विषयावर तेहरान संम्मेलनात चर्चा झाली.

अलिप्ततावादी चळवळीने आपल्या ५० वर्षापेक्षाच्या अधिक काळात अनेक यशस्वीता मिळवली. त्याचे महत्वपूर्ण यश वसाहतवाद आणि साम्राज्यवादाचा अंत, ज्यामूळे आशिया व आफ्रिकेतील सर्व देशांना स्वातंत्र्य मिळवता आले. दक्षिण आफ्रिकेतील रंगभेदाचे धोरण संपवण्यात याचे महत्वपूर्ण योगदान आहे. याशिवाय नव स्वतंत्र राष्ट्रात ऐक्य व सहकार्य वाढवणे, जागतिक मंचावर त्यांच्या दृष्टीकोणास प्रस्तुत करणे, गटबाजीपासून दूर राहून संघर्षास कमी करणे आणि जागतिक शांततेला प्रोत्साहित करण्याच्या दिशेत महत्वपूर्ण कार्य करणे ई.

१९९१ ला सोव्हिएत युनियनचे पतन आणि शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर अलिप्ततावादी चळवळीच्या औचित्याविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले. वास्तवतेत सत्य हे आहे की, अलिप्ततावादाचे तात्पर्य परराष्ट्र धोरणाच्या स्वातंत्र्याशी आहे. तसेच त्याचे उद्देश राष्ट्रांत समानता व त्यांच्या सार्वभौमत्व आणि अखंडत्वास सुरक्षित ठेवणे आहे. या अर्थाने अलिप्ततावादाचे औचित्य जाणवते. विभिन्न आंतरराष्ट्रीय समस्या व आव्हान उदा : मानवी हक्क, जागतिक व्यापारविषयक चर्चा, जलवायू परिवर्तन चर्चा आणि संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुधारणेसंदर्भात विकसनशील देशांचा दृष्टीकोण स्पष्ट करण्यासाठी एका प्रभावशाली व्यासपीठाची आवश्यकता आहे. अलिप्ततावादी चळवळ याच व्यासपीठाच्या रुपात कार्य करते.

जरी सोव्हिएत यनियनच्या पतनानंतर शीतयध्दाची समाप्ती झाली असेल, द्विध्रुवीय व्यवस्थ

Sadat Vyapari Education Society's Degloor College, Degloor Dist. Nanded

समाप्त झाली असेल परंतु गरीब आणि कमकुवत राष्ट्रांची सुरक्षितता व सार्वभौमत्वापुढील समस्या कमी झाल्या नाहीत. अमेरिकेच्या एकध्रुवीय व्यवस्थेचा प्रभाव वाढत आहे. पश्चिमेकडील देशांचा गट नाटो अधिक मजबूत होत आहे. अफगाणिस्तान व इराकमध्ये अमेरिकेची एकपक्षीय कार्यवाही भलेही दहशतवादास नष्ट करण्याच्या दृष्टीने योग्य असेल, परंतु राष्ट्रांची सुरक्षितता व सार्वभौमत्वाच्या दृष्टीने ती योग्य नाही. अशा स्थितीला थांबवण्यासाठी अलिप्ततावादी चळवळीचे सामुहिक प्रयत्न उपयुक्त ठरतात. अलिप्ततावादी चळवळीने आफ्रिका, आशिया व लॅटिन अमेरिकेतील विकसनशील देशात सहकार्य आणि एकता निर्माण करणाऱ्या व्यासपीठाच्या स्वरुपात कार्य केले. आजही या देशात आर्थिक, सामाजिक आणि राजकीय सहकार्याची आवश्यकता आहे. या सहकार्यास दक्षिण-दक्षिण सहकार्याच्या नावाने ओळखले जाते. अलिप्ततावादी चळवळ दक्षिण-दक्षिण सहकार्याचे एक व्यासपीठ उपलब्ध करते. १६ वे शिखर सम्मेलन २०१२ ला ईराणची राजधानी तेहरान मध्ये झाले. या संम्मेलनाने अलिप्ततावाद चळवळीतील राष्ट्रांची सार्वभौमत्व व परराष्ट्र धोरणाच्या स्वातंत्र्यास मांडले हे या संम्मेलनात ईरान मार्फत चालवले अण्वस्त्र धोरण आणि त्यावर संयुक्त राष्ट्र संघटना व अमेरिकेसहित इतर पश्चिमी देशांकडून लावलेल्या प्रतिबंधाच्या पार्श्वभूमीवर संपन्न झाले. या संम्मेलनात शेवटी तेहरान घोषणापत्र घोषित करण्यात आले. या घोषणापत्रात अलिप्ततावादी चळवळीच्या औचित्यावर प्रकाश टाकला. ज्यात १९५५ चे बाडुंग संम्मेलन आणि पहिल्या बेलग्रेड १९६१ संम्मेलनाद्वारा निर्धारित उद्देशाला रेखांकित केले. अलिप्ततावादी चळवळीस प्रमुख आव्हानांचा प्रतिकार करण्यासाठी सक्षम बनवण्यावर भर दिला. या घोषणापत्राने जागतिक स्तरावर एक अशी सुशासित व्यवस्थेचा विकास व्हावा जीत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि उदारतेच्या भावनेने प्रेरित असेल. ज्यात सर्व देशांची समान भागीदारी असावी. सुरक्षा, पर्यावरण प्रदुषण, आरोग्य इ. समस्यांचा प्रभावीपणे सामना करतील.

जगातील असे अनेक अभिकरण आहेत. ज्याच्या निर्णय निर्धारणात विकसनशील देशांची पर्याप्त भूमिका नाही. त्यामुळे जगातील विभिन्न संस्थांमध्ये विकसनशील देशाला अधिक प्रभावी प्रतिनिधीत्व देण्याची गरज आहे. या संबंधाने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि इतर आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थावर विशेषत्वाने अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. याशिवाय दहशतवादाच्या प्रत्येक स्वरुपास नष्ट करणे आणि त्या संबंधाने राष्ट्रामार्फत आपले दायित्वाचे निर्वाहन करण्याचा निर्णय घेण्यात आला. जगातील विभिन्न संस्कृती आणि धार्मिक समुहात आदान-प्रदानाची आवश्यकता आहे. ज्यातून त्यांच्यातील अडथळ्यांना नष्ट करता येईल. प्रत्येक देशाची संस्कृती आणि इतर विविधतांचा सम्मान करावा. जगात एक प्रकारे सांस्कृतिक प्रतिमान किंवा सामाजिक व राजकीय व्यवस्था थोपवण्याच्या सर्व प्रकाराचा विरोध करावा. याचा संबंध अप्रत्यक्ष रुपाने अमेरिकेच्या सांस्कृतिक आणि राजकीय प्रभुत्वाविरोधी अलिप्ततावाद्यांचा विरोध आहे.

अलिप्ततावादी चळवळ जगात शांतता आणि सुरक्षितता व विकासासाठीच्या प्रयत्नांचे एक प्रतीक

उद्देशप्राप्तीसाठी नव्या आंतरराष्ट्रीय नियोजनाची आवश्यकता आहे. जगातील अधिकतर समस्या आणि युध्द भडकावणे तसेच अशांतता निर्माण करण्याचे प्रमुख कारण जागतिक शक्तींची वर्चस्ववादी धोरणे व एकाधिकार कारणीभूत आहे. या वर्चस्ववादी शक्ती दबाव आणि धमकीद्वारे अण्वस्त्रांच्या आधारे जगातील नैसर्गिक साधनांवर वर्चस्व निर्माण करु इच्छितात. या एकाधिकारशाही धोरणाने शांततापूर्ण अण्वस्त्र मिळविण्याच्या प्रक्रियेसही आपल्या कवेत घेतले. वास्तवतेत वर्चस्ववादी राष्ट्र अमेरिकेला लोकशाही व स्वातंत्र्य, मानवी हक्काचे संरक्षण व अण्वस्त्रांच्या धोक्यास आपल्या वर्चस्ववादी धोरणांना योग्य म्हणण्यासाठी प्रयोग करत आहे. परंतू याच देशात मानवी हक्काचे उल्लंघन व त्याचा मजाक उडवला जात आहे. जनतेत विरोधास सक्तीने नष्ट करतात. जेंव्हा चर्चा फिलिपाईन्सच्या अधिकाराचे हणन आणि इराक व अफगाणी जनतेच्या जनसंहाराची होते. तेंव्हा दहशवादाविरुध्द लढण्याचे नाटक करून दहशतवादी गटाच्या संपर्कात राहून त्याचे समर्थन करतात.

वरील वास्तविकता लक्षात घेता माहित होते की, चळवळीतील सदस्य देशांत भौगोलिक वाढते अंतर, धार्मिक, भाषिक, सांस्कृतिक आणि जातीय विविधता शिवाय आपल्या महान उद्देश्य व आकांक्षाच्या प्राप्तीसाठी संयुक्त सिध्दांत व सहकार्य मिळवले जाते. २१ व्या शतकात जगात वर्तमान परिवर्तनास समोर पाहता हा उद्देश आंतरराष्ट्रीय परिस्थितीनुरुप आहे. वास्तवतेत अलिप्ततावादी चळवळीच्या संस्थापकांचा परस्परांतील विश्वास आणि जगातील राष्ट्रांची वर्तमान आशेत एक अतूट संबंध आहे. जो संयुक्त मानवी आशा-आकांक्षा व उद्देशांवर आधारित आहे. ज्याचे ध्येय जगात न्याय आणि अध्यात्माची प्राप्ती करणे आहे. या दृष्टिकोणानूसार वर्चस्वास न स्वीकारणे, वर्चस्ववादाचा सामना आणि जगात न्यायावर आधारित व्यवस्थेचा प्रयत्न आणि उत्तर व दक्षिण मधील अंतरास कमी करणे इ. अलिप्ततावादी चळवळीचे प्रारंभिक उद्देश होते, आजही आहेत. परंतू मुख्य बाबही आहे की, अलिप्ततावादी चळवळीतील सर्व सदस्य देशा ऐक्य, वर्चस्ववादी व्यवस्थेवर विजय व नियंत्रण मिळवण्याची मुख्य अट आहे.

## संदर्भ सूची :-


१) भारतीय परराष्ट्र धोरणाचा मागोवा परिमल माया सुधाकर.

२) आंतरराष्ट्रीय संबंध-डॉ.शैलेंद्र देवळाणकर-विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

३) आंतरराष्ट्रीय संबंध-डॉ.सुनिल शिंदे.

४) आंतरराष्ट्रीय संबंध-डॉ.प्रभा वाडकर, अरुणा प्रकाशन, लातूर.



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded